# ROTARY CLUB OF KOLHAPUR CENTRAL NEWS

RI DISTRICT 3170 | CLUB NO. : 15656 | CHARTER NO. : 15656 | ESTD ON : 13.05.1978

## MONTHLY BULLETIN SEPT 2024



**Rtn. Stephanie Urchick**
Rotary International President



**Rtn. Sharad Pai**
District Governor (RID 3170)



**Rtn. Sanjay Bhagat**
Club President



**Rtn. Ravindra Khot**
Secretory




**Rtn. Nilesh Patil**
Treasurer

ISSUE No. 01
PUBLISH DATE : 1 Aug. 2024

**Bulletin Editor :**
Rtn. Rohanraj Shinde
Rtn. Abhay Sonavane

## Eco Ganapati making workshop for children

On Sunday 1st September, Dainik Sakal organized Eco Ganapati making workshop for children at DYP Mall. Rotary Club of Kolhapur Central co-sponsored this workshop. Hundreds of boys and girls enthusiastically participated in the workshop. Even children from different religions also participated in this enthusiastically. On this occasion, we were guided on how to celebrate Ganeshotsav in an environmentally friendly way and enjoyed making Ganesha with the children.











'माझा बाप्पा' किती गोड दिसतो






इको-गणपती साकारण्याची संधी

## New Membership Orientation

Revenue District Meet under Rotary Movement Kolhapur Urban was held on Sunday 1st September. New Member Orientation and Membership Development were guided by Assistant Governor Rtn.Rahul Kulkarni, Girish Joshi and Gauri Shirgaonkar Madam.On this occasion, new members, president, secretary of all clubs in the movement were present. New members of Rotary Club of Kolhapur Central Rtn.Naresh Shingade, Rtn. Hemant Patil, Rtn.Badam Patil, Rtn.Swapnil Patil, Rtn.Rahul Mane, Rtn.Sagar Chowgle, Rtn. Manohar Patil, Rtn.Sangram Kumhar and Rtn.Vishal Patil attended. And also understood the information about Rotary.







## Birthday Celebration

Rtn. Shailesh Bhonsale Birthday Celebration

## 4 Sept, Career Guidance seminar ,
## Organised By Rotary International District 3170









४ सप्टेंबर रोजी हणमंतवाडी हायस्कूल हणमंतवाडी येथे रोटरी इंटरनॅशल डिस्ट्रक्ट ३१७० आयोजित व रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल पुरस्कृत यशाचा मार्ग– सखोल करिअर मार्गदर्शन सेमिनार घेण्यात आले .नववी व दहावीचे शंभर विद्यार्थी व पालक यांनी यामध्ये भाग घेतला.चार्टर्ड अकाउंटंट मोनिका बलदवा मॅडम यांनी खूपच मुद्देसुद करिअर विषयी मार्गदर्शन व प्रेझेंटेशन केले जे विद्यार्थी व पालकांना खूपच उपयुक्त अस होत .त्यानंतर विद्यार्थ्यांची कल चाचणीही घेण्यात आली.मुलांचे सायक्रोमेट्रिक मुल्यांकन करण्यात आले.करिअर मार्गदर्शन हँडबुक ,ऑनलाइन करिअर लायब्ररी ज्यामध्ये ३०० हून अधिक करिअर मार्गांवरील तपशीलवार माहिती आहे.व्हॉट्सअप हेल्पलाईन विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणार आहे. ओव्हरऑल हे सेमिनार विद्यार्थ्यांसाठी खूपच उपयुक्त अस झाल.

On September 5th, on behalf of the Rotary Club of Kolhapur Central, on the occasion of Teacher's Day, the members and Ans who are doing the sacred work of knowledge and the members whose parents, Ans's parents have retired from the education sector, went to their homes and honored them all by giving certificates. It is a matter of special pride for us that we were fortunate to honor the father of our member Mr. Avinash Chikanis, who has educated thousands of students in the University High School, on his 100th birthday on 4th September. All Central members enthusiastically participated in this activity.



## Close Meeting

















On Monday, September 16, organized by Rotary Club of Kolhapur Central and in collaboration with Bhairavanath Arts, Sports, Social and Cultural Friends group , ( भैरवनाथ कला,क्रीडा,सामाजिक व सांस्कृतिक मंडळ) Government Godown Area Kolhapur, a grand Blood Donation camp and Free Dental check up camp and Free General body and health check up camp were conducted. On this occasion, Rotary Central office bearers and all members and their friends attended and donated blood. The needy citizens of the area benefitted from the dental check up and general medical check up camp. Thank you to all


























शुक्रवार दि.१३ सप्टेंबर रोजी रोटरी क्लब ऑफ कोल्हापुर सेंट्रल आयोजित व अचानक मित्र मंडळ हनुमाननगर शिये यांच्या सहकार्याने पार पडलेल्या रक्तदान शिबिराला उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.५८ रक्तदात्यांनी रक्तदान करून आपलं सामाजाप्रति दाईत्व जपण्याचा प्रयत्न केला.यावेळी रोटरी सेंट्रल चे मेंबर मोठ्या संखेने उपस्थित राहिले व रोटारॅक्ट सेंट्रल च्या सदस्यांनी उपस्थित राहून रक्तदान केले त्याचबरोबर अचानक मित्रमंडळाच्या सदस्यांनीही मोठ्या संख्येन रक्तदान करून मोठ सहकार्य केल.व इथून पुढेही रोटरी सेंट्रल च्या सामाजिक उपक्रमात सहभागी राहण्याची ग्वाही दिली. आजच्या रक्तदाणाची विशेष बाब म्हणजे ८०% रक्तदात्यांनी आयुष्यात आपल पाहिल रक्तदान केलं.सर्वांचे मनापासून खूप खूप आभार.

## Birthday Celebration



Birthday Celebration Rtn Avinash Chiknis



Rtn. P. D. G. Rote & Sangram Patil
Birthday Celebration




रोटरी क्लब ऑफ कोल्हापुर सेंट्रल संचलित रोटरी ग्रामसेवा केंद्र कसबा सांगाव यांचेमार्फत गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान सर्व गणेशउत्सव मंडळांचा शाल श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व रोटरी ग्रामसेवा केंद्राचे सदस्य व रोटरी सेंट्रल चे सदस्य उपस्थित होते.






"Nation Builder Award" function was conducted on behalf of Rotary Club of Kolhapur Central on Sunday 22 September. Rtn.MB Sheikh Sir (Chairman of South Division, Rayat Education Institute, Satara) presided over. The Chief Guest was the former Controller of Examinations of Shivaji University Mr. Dr. BM Hirdekar Sir, Rtn.Rahul Kulkarni was the Chief attendee.Rotary Central President Rtn. Sanjay Bhagat gave the background of the program in the introduction Par Manowata. Sagar Bagade, recipient of the Special Satkar Murthy National Teacher Award, narrated his inspiring life journey. This increased the height of this program.Rtn.Dr. Mahadev Narke welcomed and introduced the guests Dr. B. M. Hirdekar gave detailed guidance on the challenges and opportunities in the education sector. And at the same time, the teachers who received the award were made aware of the society's expectations from them due to the Rotary award.Rtn.MB Shaikh gave information about Rotary's worldwide work in the field of education as well. Teachers were selected for this award from each district of Kolhapur district.A large number of award winning teachers, relatives, well-wishers as well as all members of Rotary Central, all members of Rotaract Central, dignitaries in the field of education were present for this event. The vote of thanks was done by the event chairman Rtn.Vishal Patil









On the occasion of Gauri Ganpati, Rotary Club of Kolhapur Central organized a lively Jhimma Fugadi competition on 18th September at Hanmantwadi High School. The event saw enthusiastic participation from all the girls in the school, as well as members of the Interact Club of Hanmantwadi, which is part of our Rotary family. It was a joyous celebration of culture and community, bringing everyone together in the spirit of festivity and fun

## बीओडी व क्लोज मिटिंग मधील विषय

१) मागील लेव मधील विषय सांगितले

२) मिटींग हॉल वरती पॉल हॅरिस,RI प्रेसिडेंट 24-25,D G 25-25 व फोर वे टेस्ट,व मोतीभाई दोषी यांचे फोटो लावणे.

३) क्लॉथ बँक राजाराम पुरी येथे भेट घेणे

४) जुन्या वह्या घेवून त्यातील चांगली पाने काढून बाइंडिंग करुन गरजू विद्यार्थ्यांना देणे.

५) हणमंतवाडी स्कूल मधे प्रोजेक्टर ची मागणी आहे.

६) RPL विषयी चर्चा झाली पास्ट प्रेसिडेंट मीटिंग मधे विषय मांडणे

७) सकाळ च्या यीन बरोबर पोलीस मित्र कार्यक्रम युवकांसाठी आहे त्यामध्ये भाग घेणे. ३ ऑक्टोबर रोजी कार्यक्रम आहे.

८) डॉ.निरंजन शहा सरानी एक नर्सिंग कॉलेजमधे शिकणारा मुलगा पाठवला होता त्याची आई त्यांच्या हॉस्पिटल मधे सफाई कामगार आहे.फी साठी मदत पाहिजे.त्याची पहिल्या वर्षाची फी डॉ. निरंजन सर यांनी भरली आहे.

९) आवळी येथील शिवाजी विद्यालय येथे दहा बेंच देणे–मागील वर्षीची मागणी आहे. संजय पाटील याना पेमेंट केले आहे.

१०) करिअर मार्गदर्शन कार्यक्रम एक घेतला आहे आणखी शाळामध्ये घेणे. इंदुमती गर्ल्स हायस्कूल व देवी पार्वती हायस्कूल मधे हा कार्यक्रम घ्यायचा प्लॅन आहे.

११) सप्टेंबर महिन्यात दोन ब्लड डोनेशन कॅम्प घेण्यात आले.पहिला अचानक मित्र मंडळ हनुमाननगर शिये यांच्या सहकार्याने व दुसरा भैरवनाथ कला क्रीडा सांस्कृतिक मंडळ यांच्या सहकार्याने घेण्यात आला. दोन्ही मिळून ९० रक्तदात्यांनी रक्तदान केले.सर्वांचे आभार=ज

१२) अंध दिनानिमित्त नॅब कडून १०० सफेद काठ्यांची मागणी आहे.एका काटीची किंमत २०० रुपये आहे.सर्व क्लब मेंबर ना आवाहन आहे ज्याना जितक्या सफेद काट्या डोनेट करायच्या आहेत त्यानी संजय भगत याना कळवावे.

१३) ANS स्टॅग ट्रिप राऊतवाडी धबधबा येथे खूप उत्साहाच्या वातावरणात पार पडली.धबधब्या जवळच असणारे वाइल्ड व्ह्युव्ह रिसॉर्ट आपण बुक केले होते.रिसॉर्ट चे लोकेशन खूपच सुंदर आणि मनमोहक होते व रिसॉर्टच्या स्टाफ ने ही खूप चांगली ट्रीटमेंट सर्वांना दिली,जेवणाची गुणवत्ता व टेस्टही व सर्व्हिस खूप छान होती अस सर्व Aans चा अभिप्राय आहे. ओव्हरऑल सर्वानी खूप मजा केली.

१४) रोटरॅक्टर यांची यावर्षीची सेंट्रल कडून फंड मिळावा असा मागणी अर्ज आहे.

# 30 Spet **Close Meeting**












## Rotary club of Kolhapur central 2024-25

NOTICE

क्लोज मीटिंग

- आजच्या BOD मध्ये ठरल्या प्रमाणे आपली सप्टेंबर ची क्लोज मीटिंग चे आयोजन उद्या करत आहोत.
- ठिकाण – मोतीभाई दोशी मेमोरियल हॉल रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर, स्वयम् स्कूल, नवीन कोर्ट च्या मागे कसबा बावडा रोड, कोल्हापूर
- तारीख -30 सप्टेंबर 2024
- वेळ - 7 PM
- मेनू - बटाटा वडापाव
- सर्वांनी मीटिंग मध्ये उपस्थित राहावे.

## Rotary club of Kolhapur central 2024-25

NOTICE

BOD Meeting

Notice is hereby given to all members of Rotary club of Kolhapur central 2024-25. The Monthly BOD Meeting of September month of Rotary club of Kolhapur central 2024-25 will be held on 29th September 2024 at 9.00am

Aggenda 1. Completion Of Work
2.RPL Disscission
3. Next Month Project Planning
4. Last BOD Meeting Discssion
5. Sept.24 Month Expenses
6.District Grant Project Discssion
7. Any other subject with request of members

ठिकाण – हॉटेल शक्ती, रुईकर कॉलनी सिग्नल

All members are requested to be present on time

Time : 9.00am

| | | |
|---|---|---|
| Rtn.Sanjay Bhagat | Rtn. Ravindra Khot | Rtn.Nilesh Patil |
| President | secretary | Treasurer |




# माझा कचरा माझी जबाबदारी

अँन : वर्षा पार्षद वायचळ.




**आपलं घर – आंगण जसं सुंदर आणि स्वच्छ आहे तसे आपले कोल्हापूर आपल्याला हवे आहे का ? जर आपलं उत्तर हो असेल तर आपण कामाला लागू या,**

आपल्याला सर्वांना माहीतच आहे आपले पर्यावरण बिघडण्याचे कारण वृक्षतोड आहेच पण प्लास्टिक हा ही एक मोठा राक्षस आहे, रोजचा प्लास्टिक कचरा जसे की बिस्कीटचे पुडे, शाम्पू, बाथरूम क्लीनर च्या बाटल्या, प्लास्टिकचे कॅन, प्लास्टिक कॅरी बॅग, खेळणी, प्लास्टिकच्या बारीकसारीक वस्तू, दोऱ्या हे सर्व प्लास्टिक आपण सुट्टे एका पिशवीत भरून ठेवावे व आपल्या कडे येणाऱ्या घंटागाडीला किंवा आपल्याकडे बऱ्याच संस्था आहेत ज्या प्लास्टिक गोळा करण्याचे काम करतात त्यांना आपण संपर्क करावा, ते आपल्या घरातून मोफत मध्ये येऊन घेऊन जातात,

ओला कचरा जसे की भाज्यांची देठे, घरातले खरकटे,बागेतील पाला पाचोळा यांचे घरातील अगदी छोट्याशा कोपऱ्यामध्ये प्लास्टिकच्या ड्रम मध्ये ही सेंद्रिय खत करता येते,याची आपण तज्ञांकडून माहिती घ्यावी,हे करण्यास अतिशय सोपे आहे, साधारण तीन महिन्यात आपला सेंद्रिय खत तयार होते ते आपण आपल्या बागेत वापरू शकतो.

ओला कचरा व सुका कचरा वेगळा करून दिल्यामुळे आपले घर तर स्वच्छ राहिलाच पण वातावरण पर्यावरनास ही कोणता धोका निर्माण होणार नाही.

गटरी मध्ये प्लास्टिक बाटल्या, प्लास्टिक पिशव्या साठवून गटरी तुंबतात  त्यामुळे डास होतात व रोगराई वाढते.. तसेच गाई म्हशींच्या पोटामध्ये प्लास्टिक जाते, पक्षी या प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये अडकतात त्यांचे शरीर या प्लास्टिक पिशव्या आणि प्लास्टिक दोऱ्या मध्ये अडकून ते जखमी होतात जलचर प्राण्यांच्या पोटामध्ये तर असंख्य प्लास्टिकचे तुकडे आढळलेले आहेत, यामुळे पर्यावरणातील अन्नसाखळी तुटत चालले आहे , अनेक जातीचे प्राणी, पक्षी,जलचर प्राणी आणि झाडे नष्ट होऊन गेले आहेत, याला जबाबदार फक्त मनुष्य आहे,

आता वेळ आली आहे चूक सुधारण्याची,आपल्याकडून पर्यावरणास कोणताही धोका निर्माण होऊ नये यासाठी आपण प्रत्येकाने खारीचा वाटा उचलूया, व माझा कचरा माझी जबाबदारी हा हेतू मनामध्ये ठेवून आपल्या परिवारा व परिसरा मध्ये एक चांगला आदर्श निर्माण करूया.

जय वसुंधरा

# संपत्ती आणि संस्कार

संस्काराचे मूल्य हे नेहमीच जास्त असते, कारण संपत्ती असेल तर फक्त विल तयार होते, पण जर संस्कार असतील तर गुडविल तयार होते. वेळेला वेळ देणारा माणूस वेळेवर भेटला की चांगली वेळ यायला वेळ लागत नाही.

यशस्वी आयुष्यापेक्षा समाधानी आयुष्य केंव्हाही चांगलं, कारण यशाची व्याख्या लोकं ठरवितात आणि समाधानाची व्याख्या आपण स्वतः सिद्ध करतो. रात्रभर गाढ झोप लागणं याला सुध्दा नशिबच लागतं. पण हे नशिब मिळवण्यासाठी सुध्दा दिवसभर इमानदारीचं आयुष्य जगावं लागतं. सगळेच धडे शाळेच्या पुस्तकांमधून शिकायला हवेत असे काही नाही, काही धडे आयुष्यात नाती व मित्र आणि समाज यांच्याकडूनही शिकायला मिळतात. डोळ्यातून पडलेले अश्रू आणि नजरेतुन पडलेली माणसं पुन्हा त्याची स्वतः ची जागा कधीच घेऊ शकत नाहीत. बरोबर ना माणसाची आर्थिक स्थिती कितीही चांगली असली तरीही जीवनाचा खरा आनंद घेण्यासाठी त्याची मनस्थिती चांगली असावी लागते. संयम नावाच्या कटू वृक्षाची फळे नेहमी गोड असतात.

संयम हीच जीवनातील खरी परीक्षा आहे, जेवढा वेळ तुम्ही संयम ठेऊन काम कराल, तेवढेच यश ही मोठेचं असते कुणाला दुखावून मिळविलेला आनंद कधीच सुख देऊ शकत नाही. पण कुणाला आनंद मिळावा म्हणून, स्वीकारलेला त्रास नेहमीच सुख देतो. माणसाला बाहेरून शांत दिसण्यासाठी आतून अनेक लढाया कराव्या लागतात. त्यासाठी संयम असावा लागतो. संयम राखल्यास माणूस जीवनात प्रत्येक लढाई सहज जिंकू शकतो, जीवनात शांतीने रागाला नम्रतेने अभिमानाला सरळतेने मायेला आणि समाधानाने लोभीपणाला जिंकू शकतो.

तुमचे अश्रू कोणाच्याही लक्षात येत नाहीत, तुमच्या दुःखाची कोणीही दखल घेत नाही, तुमच्या वेदना कोणीही लक्षात घेत नाहीत, परंतु ते सर्व फक्त तुमच्या चुका लक्षात घेतात, जीवनातील कठीण प्रसंग किंवा अडचणी हे आपलं नुकसान करण्यासाठी नसतात, तर आपल्या अंतर्गत असलेली शक्ती व सामर्थ्य यांना उत्तेजीत करून, यश प्राप्त करण्यासाठी असतात. आयुष्य हे एकदाच आहे, मी पणा नको सर्वांशी प्रेमाने रहा, सोनं वितळले की दागिने बनतात, माती नरम झाली की शेती बनते, पीठ नरम झाले की पोळी बनते.

अगदी अशाच प्रकारे माणूस नम्र झाला की, लोकांच्या ह्रदयात त्याची जागा बनते. मन हळवं असावं, पण दुबळ नसावं, कारण हळव्या मनास भावना कळतात, तर दुबळ्या मनास नेहमी वेदना छळतात, जे हरवले आहेत, ते शोधल्यावर परत मिळतील, पण जे बदलले आहेत ते मात्र कधीच शोधून मिळणार नाहीत. मोत्याच्या हारापेक्षा घामाच्या धारांनी मनुष्य अधिक शोभून दिसतो. तीच नाती जास्त काळ टिकतात जी एकमेकांवर रुसतात, रागावतात. पण साथ कधीच सोडत नाहीत. कडुनिंबाची चूक नाही की तो कडू आहे. स्वार्थी तर जीभ आहे, तिला फक्त गोड आवडतं. संगत अशी ठेवा जे तुम्हाला सोबत घेऊन चालण्यात योग्य समजतील पाठीमागे ढकलण्यात नाही.

आयुष्यात एखाद्याला रडवून कितीही पूजा पाठ होमहवन केले तरी काही एक फायदा होणार नाही. पण जर रोज एखाद्याच्या चेहऱ्यावर हसू आणले, तर साधी अगरबत्ती सुद्धा लावायची गरज पडणार नाही. इतिहासात भविष्य शोधत बसायचं की भविष्यात इतिहास घडवायचा सर्वस्वी आपल्या हातात आहे. तुम्ही मागे जाऊन तुमचा भूतकाळ बदलू शकत नाही, पण तुम्ही आज जिथे आहात तिथून एक नवीन सुरुवात नक्कीच करू शकता आणि तुमचे भविष्य बदलू शकता, विचारधन परिवर्तन, जय सद्गुरू श्री स्वामी समर्थ महाराज

दररोज परमेश्वराला प्रार्थना करा. आजपर्यंत जे दिले ते तुझेच आहे. मी निमित्त मात्र आहे. इतरांपेक्षा मला तू भरपूर दिलेस. आमचे राहिलेले आयुष्यही तुझ्या कृपाशिर्वादाने सुख, शांती, समाधान, आनंद व  समृध्दीचे जाण्यासाठी नामस्मरणाची ताकद दे व तुझी आठवण आम्हास सतत होऊ देत. चांगले आरोग्य दिल्यास तुझी सेवा अखंड करता येईल आणि सेवा करताना हे शरीर तुझे आहे. या शरीराला कोणताही घातपात होऊ नये. याचीही काळजी तुच घे.